श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
पोस्ट : शिर्डी -४२३१०९, ता.राहाता, जि. अहिल्यानगर महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८५००

ई-मेल द्वारे / रजि.पोष्टाने

जा. क्र. एसएसएस/वशी-लाडूप्रसाद/ 2452 /२०२६
दिनांक - 28 SEP 2026

प्रति,
मे. शिवसाई एन्टरप्राईजेस,
प्रो.पा.सोन्याबापु गंगाधर शेळके (मयत) यांचे कायदेशीर वारस,
१) श्रीमती विमल सोन्याबापु शेळके
२) श्री चंद्रकांत सोन्याबापु शेळके
३) श्री नंदकुमार सोन्याबापु शेळके
४) सौ. योगिता संतोष चव्हाण
सर्व रा. निमगांव को-हाळे, चारी नं.११
हॅलीपॅड रोड, भाऊसाहेब कातोरे वस्ती,
निमगांव - शिर्डी. ता.राहाता, जि. अहिल्यानगर

विषय:- सन २०१९-२० मध्ये मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.७,५०,०००/- जप्त करणे व त्यांना पुढील ०३ वर्ष कालावधीकरीता काळया यादीत समाविष्ट करणेबाबत...

संदर्भ :- १) जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/१८१७/२०१९, दि.१२/०८/२०१९ रोजीचा कार्यादेश,
२) दि.०७/०९/२०१९ रोजी ठेकेदारासोबत केलेला १ ते ३७ अटी-शर्तींचा करारनामा.
३) आवक क्र.५७४७, दि.०१/१०/२०२० रोजीचे लाडु कर्मचा-यांचे तक्रारपत्र.
४) जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/१९७५/२०२०, दि.२८/१०/२०२० रोजीची नोटीस.
५) जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/११४/२०२०, दि.०६/११/२०२० रोजीची नोटीस.
६) जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/१८०३/२०२०, दि.१२/१०/२०२० रोजीची नोटीस.
७) दि.२८/११/२०२० रोजी ॲड. जे.के.गोंदकर यांचेमार्फतीने रजि.ए.डी.व्दारा नोटीस.
८) दि.१२/०९/२०२६ रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेतील विषय क्र.४०, निर्णय क्र.३९४

आपले एजन्सीला सन २०१९-२० करीता मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन देण्याचे दि.१६/०९/२०१९ ते दि.१५/०८/२०२० अखेर व मुदतवाढ दि.१६/०८/२०२० ते दि.३१/१२/२०२० अखेर कंत्राट दिले होते. याकामी रक्कम रु.७.५० लाख (अक्षरी रुपये – सात लाख पन्नास हजार मात्र) सुरक्षा अनामत रक्कम संस्थान खाती जमा करणेत आली होती.

आपणास कोव्हीड काळात आपलेकडील कंत्राटी कामगारांना माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करुन, कर्मचा-यांचे वेतन आदा केल्याची बॅंक यादी व वेतन बिले सादर करणेबाबत

कळविणेत आले होते. तथापि, आपण कर्मचा-यांचे वेतन बँकेत जमा केलेची खोटी माहिती सादर करुन संस्थानची दिशाभुल केली. याबाबत आपणांस वेळोवेळी संदर्भीय नोटीसा देणेत आल्या असुन, आपण सदर नोटीसांचा कोणताही खुलासा इकडील कार्यालयास सादर केला नाही. तसेच आपण सन २०१९-२० मध्ये मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन देणे इ. काम/ कंत्राट समाधानकारक पुर्ण केलेले नसुन, करारनाम्यातील अटी-शर्तीचे उल्लंघन/भंग केला आहे. त्यामुळे मे. शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचे नावे संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.७,५०,०००/- (अक्षरी रुपये – सात लाख पन्नास हजार मात्र) संस्थानखाती जप्त करुन आपल्या एजन्सीला पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता काळया यादीत टाकणेबाबत दि.०१.०९.२०२६ रोजीचे मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभा निर्णय क्र.३९४ अन्वये, मान्यता मिळालेली आहे.

त्यासअनुसरुन आपल्या एजन्सीची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.७,५०,०००/- (अक्षरी रुपये – सात लाख पन्नास हजार मात्र) संस्थानखाती जप्त करणेत आली असुन, आपल्या एजन्सीचे नाव पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता काळया यादीत (Black List) समाविष्ट करणेत येत आहे. आपणांस यापुढे तीन वर्षाचे कालावधीत संस्थानचे कोणत्याही ई-निविदा प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
GORAKSHA MAHADEO GADILKAR
Date: 26-09-2026 20:16:58

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

प्रत :-

१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्यकार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी, सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
२) सर्व विभागप्रमुख / प्र .अधिक्षक
३) स्थळप्रत